# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७ / फाल्गुन २६, १९३८ ( शके )**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६७**

---

### अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात आत्मा योजनेंतर्गत शिफारस केलेली बियाणे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१) * २८६२७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात कृषी विभागाकडून आत्मा योजनेंतर्गत शिफारस केलेल्या आयसीपीएच २७४० तूर बियाणे तसेच कुर्डुवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथे कृषी विभागाकडून पुरविण्यात आलेले तूर बियाणे निकृष्ट दर्जाचे असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बियाणांची शिफारस करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, अंशत: खरे आहे, आयसीपीएच २७४० या संकरीत वाणाचे सोलापूर जिल्ह्यात १००० प्रात्यक्षिके घेण्यात आली आहेत. त्यापैकी २६ गावातील एकुण १८३ शेतकऱ्यांच्या लेखी स्वरुपात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) प्राप्त तक्रारीनुसार इक्रिसॅटचे शास्त्रज्ञ अनुपमा हिंगणे यांनी दिनांक १७/०१/२०१७ रोजी भेट दिलेली आहे. शासनाने गठीत केलेल्या उपविभागीय कृषी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील तक्रार निवारण समितीने पाहणी केली आहे. पिकांचा हंगाम लांबला असून फुलांच्या प्रमाणात शेंगा कमी लागल्या आहेत. उत्पादकतेची आकडेवारी अद्याप प्रलंबित असुन तक्रार निवारण समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उबर या खाजगी प्रवासी कंपनीवर कारवाई करण्याबाबत**

**(२) * २८०५९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) “उबर” या खाजगी प्रवासी वाहनातून प्रवास न करताही प्रवाशांकडून रुपये ५०/- जादा वसूल केले जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उबर मधून प्रवास करण्यासाठी मोबाईल ॲपमधून नोंदणी करावी लागते व प्रवास रद्द केलेल्या नंतर जेव्हा कधी पुन्हा प्रवास केल्यास त्या प्रवासी भाड्यामध्ये रुपये ५०/- फेअर इस्टिमेट म्हणून वसूल केले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रवाशांकडून अवैध मार्गाने पैसे उकळणाऱ्या उबर या खाजगी प्रवासी कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच, अशाप्रकारे प्रवाशांची फसवणूक होऊ नये याकरिता अशा खाजगी प्रवासी कंपन्यांसाठी नियमावली तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) उबर या खाजगी प्रवासी वाहनातून प्रवासाचे आरक्षण करुन प्रवास न केल्यास पुढील प्रवासाच्या वेळी संबधित प्रवाशांकडून रु.५०/- एवढी जादा रक्कम वसूल केली जाते, असे निदर्शनास आलेले आहे.

(३) समुच्चयक कंपन्याव्दारे चालविण्यात येणाऱ्या संकेतस्थळ आधारित टॅक्सी सेवाबाबत सेवेचे विनियमन करण्यासाठी दिनांक ०४/०३/२०१७ च्या अधिसुचनेन्वये "महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम २०१७" करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील पशु चिकित्सा केंद्राची झालेली दुरवस्था**

**(३)**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०१७

शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७

## : : शुध्दीपत्रक : :

तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक (१), (३५) व (५६) वरील प्रश्न श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांच्या नावे आहेत. तथापि, यादीतील अनुक्रमांक (३) वर निलंबित सदस्य, श्री.प्रशांत परिचारक, वि.प.स. यांचे नावे असलेला तारांकित प्रश्न क्रमांक २८०१५ हा सहसदस्य म्हणून श्री.रामहरी रूपनवर, वि.प.स. यांचे नावे दर्शविण्यात आला असता त्यांचे नावे यादीत एकूण चार प्रश्न होत असल्याने म.वि.प. नियम ७५ (१) च्या अधीन राहून तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक (३) वरील ता.प्र.क्र.२८०१५ प्रश्नोत्तराच्या यादीतून वगळण्यात आला आहे.

~~सदर ठिकाणी शासकीय दवाखान्याच्या वेळा कटाक्षाने पाळल्या जात असून, कोणत्याही पशुपालकास उपचारासाठी ताटकळत बसावे लागत नाही. शासकीय वेळेनंतर आलेल्या पशुरूग्णास सुध्दा उपलब्धतेनुसार व आजाराचे गांभीर्य पाहून पशुवैद्यकिय सेवा गरजेनुसार तात्काळ उपलब्ध करुन दिल्या जातात.~~

~~सदर दवाखान्यात उपचारासाठी पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस व परिसरातील दररोज सुमारे ५० ते ६० पशुरूग्ण येतात. सन २०१६-१७ या वर्षात माहे जानेवारी, २०१७ अखेर झालेले तांत्रिक कार्य पुढील प्रमाणे आहे :-~~

~~कृत्रिम रेतन-९८६, औषधोपचार-१२५७६, लसीकरण-२१४५०, खच्चीकरण-१५४२, शस्त्रक्रिया-१४९८, गर्भधारणा तपासणी-१४४३, वंध्यत्व तपासणी-१०५५~~

~~सदर दवाखान्यात रिकाम्या झालेल्या बाटल्या ठेवण्यासाठी कचराकुंड्या ठेवण्यात आल्या असून, त्याची योग्य रितीने विल्हेवाट लावली जाते.~~

~~(४) प्रश्न उद्भवत नाही.~~

-----------------

## नांदेड शहरातील हिंगोली गेट ओव्हर ब्रिजवरील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) * २९०४६ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील हिंगोली गेट ओव्हर ब्रिजवरील रस्त्यावर खड्यांमुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून अशा रस्त्यावरून वाहने चालवणे त्रासदायक व धोकादायक झाले असून या धोकादायक रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

हिंगोली गेट ओव्हर ब्रिजवरील रस्ता खड्यांमुळे खराब झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. परंतु या रस्त्यावर अपघात होत असल्याची माहिती जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(२) हिंगोली गेट ओव्हर ब्रिजवरील रस्त्याची दुरुस्तीची कामे स्थायी समितीच्या मान्यतेनंतर नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करण्याबाबत**

**(५) * २७८२५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४३७२ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासंदर्भात विविध उपाययोजना करण्यासाठी कार्यरत असलेल्या कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या तसेच बळीराजा चेतना अभियान या उपक्रमाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढवून त्यामध्ये इतर जिल्ह्यांचा अंतर्भाव करण्यासंबंधी बाब तपासण्याविषयीची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, नाशिक विभागात दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१६ अखेर एकूण ४४९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबियांच्या मदतीपैकी २२१ आत्महत्याग्रस्त कुटूंबिय मदतीस पात्र ठरविण्यात आले असून दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ अखेर फक्त ४८ प्रकरणास मदतीचे प्रदान करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासकीय मदतीपासून वंचित राहिलेल्या आत्महत्याग्रस्त कुटूंबियाना मदत करण्याबाबत तसेच, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) कार्यवाही पूर्ण झालेली नाही.
(३) नाशिक विभागात दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१६ अखेर एकूण ४८४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी २४२ प्रकरणे पात्र ठरविण्यात आली आहेत. पात्र सर्व प्रकरणी दि.२३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये रू.१ लक्ष मदत अदा करण्यात आली आहे.
(४) इतर जिल्ह्यांचा अंतर्भाव करण्यासंबंधीची बाब तपासण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शन व**
**व्यापारी केंद्र विकसित करण्याबाबत**

**(६) * २७९७८ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्याकरिता उद्योग संचालनालयाला जागा हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव माहे जून, २०१६ पासून महसूल विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्रासाठी उद्योग संचालनालयाने रुपये ६० कोटीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाशिक येथे औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्रासाठी उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या जागा मागणीच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दिनांक ०२/०३/२०१६ रोजी उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक व उक्त जागा मागणी प्रकरणी अभिप्राय/ना हरकत दाखले आवश्यक असलेल्या सर्व संबंधितांची एकत्रित बैठक घेण्यात आली. सदर बैठकीदरम्यान उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना उक्त जमिनीच्या मोजणी संदर्भात फी भरणेबाबत कळविण्यात आले असता उद्योग सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी सदर प्रकल्पाच्या विशेष हेतू वाहन संस्थेस म्हणजे मे.नाशिक इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, नाशिक यांना त्याबाबत कळविले आहे. मात्र सदर

जागेची मोजणी फी अद्यापही भरलेली नसल्यामुळे जागेची मोजणी झालेली नाही. मोजणी फी भरल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे. या पार्श्वभूमीवर उद्योग संचालनालयाने सदर केंद्रासाठी रु.६० कोटीचा प्रस्ताव अद्याप शासनाच्या मान्यतेसाठी सादर केलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयातील महामार्गालगत वृक्षांची लागवड करण्याबाबत**

**(७) * २८४१३ श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ व २२२ यांसह विविध रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सुरु असून रुंदीकरणाच्या कामावेळी रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर तोड केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या लगतच्या वृक्षांची तोड केल्यानंतर त्याजागेवर नवीन वृक्ष लागवडीसाठी शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हयात मागील तीन वर्षांत किती वृक्षतोड झालेली आहे, वृक्षतोडीनंतर नियमाप्रमाणे आवश्यक त्या प्रमाणात नवीन वृक्षांची लागवड करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवीन वृक्ष लागवडी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) वृक्षांची तोड केली आहे, हे खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत येडशी औरंगाबाद या राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ च्या रुंदीकरणासाठी बीड जिल्हयामध्ये ३८९३ झाडे संबंधित प्राधिकरणाच्या परवानगीने तोडण्यात आली आहेत.

तसेच कल्याण निर्मल या राष्ट्रीय महामार्ग २२२ (नवीन क्र.६१) च्या रुंदीकरणासाठी बीड जिल्हयातील ४०१ झाडे तोडण्यात आली आहेत.

(२) व (३) ह्या महामार्गांचे रुंदीकरण पूर्ण झाल्यानंतर एका तोडलेल्या झाडासाठी किमान तीन ह्या प्रमाणात वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------------

## मौजे मुंगी आणि देवठाणा (ता.धारूर, जि.बीड) या परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(८) * २७०३५ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुंगी आणि देवठाणा (ता.धारूर, जि.बीड) या परिसरात ६० मेंढ्यांनी कापसाचे हिरव्या पळाट्या (हिरवी बोंडे) खाल्यामुळे विषबाधा होऊन मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे मुंगी आणि देवठाणा, ता.धारुर, जि.बीड या परिसरात मेंढयांनी कापसाची हिरवी बोंडे खाल्यामुळे त्यांना ऑग्झॅलेट विषबाधा होऊन मृत्यू झाल्याचे आढळून आले. याबाबत पशुधन विकास अधिकारी यांना कळविले असता, त्यांनी घटनास्थळी तात्काळ भेट देऊन आजारी मेंढ्यावर उपचार सुरू केले. आजारी मेंढ्यांना ऑग्झॅलेट विषबाधा झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मृत्यू झालेल्या मेंढ्या बाबत महसूल विभागाने पंचनामे केले आहेत. विषबाधेने मृत्यू ही बाब नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमध्ये समाविष्ट होत नसल्याने सदरची घटना नैसर्गिक आपत्ती होवू शकत नाही. त्यामुळे शासन प्रचलित धोरणाप्रमाणे आर्थिक मदत अनुदेय नसल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी पशुपालकांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अवैध वाळु उपसा रोखण्याबाबत**

**(९) * २९३३६ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात गोदावरी नदीपात्र पैठण ते हिरडपुरी वाळु तस्करी होत असून गोदावरी पात्रात अनेक ठिकाणी केनी यंत्र टाकून वाळूचा उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत तसेच वाळुमाफियांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) तहसिलदार, पैठण यांच्या पथकाने दिनांक ५/०१/२०१७रोजी केलेल्या तपासणीत पैठण हद्दीतील गोदावरी नदीपात्राजवळ यारी मशीन व केनीच्या सहाय्याने वाळूचे अवैध उत्खनन करून ९ ब्रास वाळूसाठा केल्याचे दिसून आले. त्यानुसार तहसिलदार, पैठण यांनी त्या ठिकाणावरील वाहन जप्त करून संबंधित वाहन मालकाविरूध्द दंडात्मक कारवाई करून रु.२,२८,७२५/- एवढ्या दंडात्मक रकमेचे आदेश पारीत केले आहेत. सदर वाहनाविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय जमिनीवर राहत असलेल्या कुटुंबांना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत**

**(१०) * २६९३१ श्री.अनिल भोसले, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय जागेवर राहत असलेल्या कुटुंबांना मालकी हक्काचे उतारे देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने सन २०१५ मध्ये दिले असूनही या आदेशाची अंमलबजावणी महसूल विभागाने न केल्यामुळे सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याची प्रधानमंत्री आवास योजना महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित राहिल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जमिनीच्या मालकी हक्काचे उतारे देऊन प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) "प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे-२०२२" या योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय व निमशासकीय संस्था या अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत सर्वसमावेशक निर्देश महसूल व वन विभागाच्या दिनांक १९/९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

शासन निर्णय दिनांक ४/४/२००२ अन्वये दिनांक १/१/१९९५ रोजी अस्तित्वात असलेले शासकीय जमिनीवरील झोपडपट्टींची अतिक्रमणे नियमित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तथापी मा.सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपिल क्र.११३२/२०११ एसएलपी (सी) ३१०९/२०११ जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब राज्य व इतर या याचिकेवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८/१/२०११ रोजी दिलेल्या निदेशानुसार शासनाने दिनांक १२/७/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक वापरातील जमिनी/गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अशा जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत आदेश पारीत केले आहेत. त्यामुळे गायरान जमिनीवरील निवासी अतिक्रमणे शासन निर्णय दिनांक ४/४/२००२ प्रमाणे नियमाकूल करता येत नाहीत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयाच्या व तदनुषंगिक शासन निर्णय दिनांक १२/७/२०११ च्या अनुषंगाने सत्वर उचित कार्यवाही करण्याचे निर्देश उक्त जनहित याचिकेत मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २३/६/२०१५ रोजी दिले आहेत.

-----------------

## कल्याण, विठ्ठलवाडी, भिवंडी येथून कोकणात जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवा बंद झाल्याबाबत

**(११) * २९७५६ श्री.रविंद्र फाटक, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयंत पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या उपस्थानकावरून सुमारे ६० बसेस कल्याण, विठ्ठलवाडी, भिवंडी येथून कोकण विभागात जाणाऱ्या-येणाऱ्या अनेक राज्य परिवहन विभागाच्या बस सेवा बंद करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थानकांवर पोलीस चौकी, कॅन्टीन, वृत्तपत्रांचा स्टॉल इ.सेवा नसून, बस स्थानक परिसरात दुर्गंधी झाली असल्याने बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर बस सेवा सुरू करून बसस्थानक परिसराची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) डोंबिवली बसस्थानकातून कल्याण-चिपळूण, कल्याण-पाली, कल्याण-अलिबाग, कल्याण-शिवथरघळ या फेऱ्या कमी प्रवासी भारमानामुळे तूर्त स्थगित ठेवण्यात आल्या आहेत. सदर स्थगित फेऱ्या होळी, उन्हाळी सुटी, गणपती उत्सव व दिवाळी या गर्दीच्या हंगामात चालविल्या जातात.

(२) व (३) डोंबिवली बस स्थानकात कमी प्रवासी वर्दळ असल्याने पोलीस चौकी, कँटीन, वृतपत्र स्टॉल यांची आवश्यकता भासलेली नाही. बसस्थानकात आगाऊ आरक्षणाची सोय आहे. तसेच सदर बसस्थानकात सफाई कामगाराकडून नियमित साफसफाई केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोटार वाहन शुल्कात करण्यात आलेली वाढ कमी करण्याबाबत**

**(१२) * २६८५९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या प्रादेशिक परिवहन विभागाकडून आकारण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या शुल्कांमध्ये वाढ करण्यात आल्यामुळे वाहन शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या शिकाऊ वाहन परवान्यासह दुय्यम नोंदणी पुस्तक देण्यासाठी वाहनधारकांना अधिकचे पैसे भरावे लागणार असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन शिकणाऱ्यांसाठी शिकाऊ वाहन परवाना घेणे बंधनकारक असल्याने त्यासाठी पूर्वी आकारले जात असलेल्या रुपये ३० या शुल्कात वाढ करून रुपये १५० एवढे केल्याने शिकाऊ वाहनधारकांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मोटार वाहन शुल्कात करण्यात आलेली वाढ व परिवहन विभागाकडून आकारण्यात येणाऱ्या वेगवेगळया शुल्कामधील वाढ कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) मोटार वाहन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवांचे शुल्क केंद्र शासनाने सन १९८९ मध्ये विहीत केलेले होते. सदर शुल्कामध्ये केंद्र शासनाने दिनांक २९/१२/२०१६ च्या अधिसूचनेन्वये वाढ केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयातील महामार्गाचे रूंदीकरण्याबाबत

**(१३) * २९५८७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातून मार्गस्थ होणाऱ्या महामार्गावर गत महिन्याभरात अपघात होऊन दहा जणांचा बळी गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाच्या रूंदीकरणाचे कामही अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या महामार्गावरील होणारे अपघात रोखण्याकरिता तसेच महामार्ग रुंदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) जळगांव जिल्हयातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ६ वर जानेवारी, २०१७ मध्ये अपघात होऊन आठ जणांचा बळी गेला असल्याचे पोलीस अधिक्षक, जळगांव यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत ह्या राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सन २०१२ मध्ये हाती घेण्यात आले होते. तथापि भूसंपादन, आवश्यक परवानग्या व निविदेस प्रतिसाद नसणे इ. बाबींमुळे कामास विलंब झालेला आहे.

चिखली ते फागणे ह्या १५० कि.मी. राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे बांधकामासाठी दोन भागात निविदा स्वीकृती झाली असून करारनामा झाल्यानंतर सवलतकारामार्फत काम हाती घेण्यात येईल. या कामामध्ये जळगांव बाह्यवळण रस्त्याचे बांधकाम समाविष्ट असून जळगांव शहरातून जाणाऱ्या अस्तित्वातील राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.

----------------

## परिवहन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) * २७५८९ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नोंदणी झालेल्या वाहनांची संख्या ३ कोटीच्या दरम्यान असून दरवर्षी २० लाख नवीन वाहनांची नोंदणी होत आहे, यासाठी केवळ ४ हजार कर्मचारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्यात ३१/०१/२०१७ अखेर २,९८,०७,४९७ वाहनांची नोंदणी झालेली असून, एप्रिल, २०१३ ते जानेवारी, २०१७ पर्यंत १९,३७,५९१ इतक्या नवीन वाहनांची नोंदणी झालेली आहे. सदर नोंदणीसाठी एकूण ५,१०० अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून, त्यापैकी २,८७० पदे भरलेली आहेत.

(२) रिक्त पदांपैकी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पदाच्या १८८ तर सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी पदांच्या ३ जागांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत एकूण १६१ लिपीक टंकलेखक संवर्गातील उमेदवारांपैकी नियुक्तीस पात्र ठरलेल्या व हजर झालेल्या १०९ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. याशिवाय लिपीक टंकलेखक या संवर्गातील उर्वरित ८८ रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासही शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गट-क व ड मधील पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेगाव ते पंढरपूर दिंडी मार्गाच्या रूंदीकरणाबाबत

**(१५) * २७४९६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र शेगाव ते श्रीक्षेत्र पंढरपूर या दिंडी मार्गाच्या रूंदीकरणाबाबतची घोषणा शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मार्गास निधी उपलब्ध करून दिंडी मार्गाच्या रूंदीकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) प्रश्नांकित उल्लेख करण्यात आलेल्या पालखी मार्गापैकी सोलापूर जिल्ह्यातील २०.३०० कि.मी. लांबी ही पालखी मार्गाचा भाग असून रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाची रूंदी ७ कि.मी. आहे. हा रस्ता केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषीत केलेला असून या रस्त्याच्या सुधारणा, देखभाल व दुरूस्तीची कामे केंद्र शासनामार्फत होणे अपेक्षित आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीपैकी अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील उर्वरित लांबीपैकी रू.६७३.८५ कोटी रकमेची रस्त्यांच्या रूंदीकरणाची व मजबुतीकरणाची कामे अन्यूइटी धोरणांतर्गत मंजूर आहेत. याकामाचे प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर आधारीत निविदा बोलवून कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कोकणातील महामार्गावरील पुलांची दुरूस्ती करण्याबाबत

**(१६) * २९३५८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील महामार्गावरील महत्वाचे २० पूल आणि १०० वर्षापूर्वी बांधलेले दगडी बांधकाम चुना आणि कमानी असलेले ३४ पूलांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले व तद्नुसार सदर पूलांचे सर्वेक्षण स्ट्रक्चरल ऑडिट करून त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही,
सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवर ३२ पूल ब्रिटीशकालीन आहेत. सर्व पूल सुस्थितीत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परराज्यातील वाहने छुप्या पध्दतीने राज्यात आणत असल्याबाबत**

**(१७) * २९७४४ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परराज्यात वाहनांवर असणाऱ्या कमी करांचा फायदा घेवून नोंदणी करुन नंतर राज्यात छुप्या पध्दतीने अलिशान गाड्या आणण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा प्रकारे करचोरी करणाऱ्या आलिशान गाडयांचे खरेदीमूल्य आणि त्यावर करांची किंमत लक्षात घेता या गाडयांच्या मालकांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) महाराष्ट्र मोटार वाहन कर कायदा १९५८ मध्ये राज्यात खाजगी मोटार वाहनांवर त्यांचे किंमतीवर निर्धारीत टक्केवारीने एकरकमी मोटारवाहन कराचा भरणा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र वगळता अन्य राज्यात वाहन नोंदणी करून या राज्याचा देय कर न भरता वाहने चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यावरुन दिनांक १८/०१/२०१७ ते दिनांक ०१/०३/२०१७ या कालावधीतील विशेष मोहिमेंतर्गत ५९५ वाहने तपासण्यात आली असता ९३ वाहने दोषी आढळून आली. सदर दोषी वाहनांवर कार्यवाही करण्यात येवून कर व व्याजापोटी रुपये ५.५० कोटी एवढी रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**टेंभापुरी (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१८) * २७६५५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४८७४ ला दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभापुरी (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) प्रकल्पग्रस्तानी श्रमिक मुक्तीदलामार्फत विभागीय आयुक्त, औरंगाबाद कार्यालयावर मोर्चा काढून मागण्याचे निवेदन दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून टेंभापुरी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांनुसार त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १. पुनर्वसित गावठाणात प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करण्यात आले असून नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

२. प्रकल्पग्रस्तांनी, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतुदीनुसार पर्यायी जमीन मिळण्यासाठी मोबदल्याच्या ६५% रक्कम शासन जमा करणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांनी भुसंपादन मोबदला प्राप्त झाल्यानंतर पर्यायी जमिनीसाठी भोगवटामूल्य (६५% रक्कम) अदा केले आहे त्यांना पर्यायी जमिनी देण्यात आल्या आहेत, परंतु ज्यांनी उपरोक्त प्रमाणे भोगवटामूल्य अदा केले नाही आणि दिर्घकालावधीनंतर पर्यायी जमिनीची मागणी केली आहे. त्यांना पर्यायी जमिनीचे वाटप अनुज्ञेय नाही. पर्यायी जमीन/भूखंड मागणीचे मुदतबाह्य अर्ज विचारात घेऊ नयेत असे अधिमत महाअधिवक्ता यांनी दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यात दुधाळ जनावराचे**
**वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१९) * २७२७७ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही पंचायत समिती (जि.चंद्रपूर) अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्यावतीने विशेष घटक योजनेंतर्गत दुधाळ जनावराचे वाटप करतांना मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना वाटप न करता संबंधित पशुधन विकास अधिकारी यांनी बोगस लाभार्थ्यांचे नावे बनावट दस्ताऐवज तयार करून दुधाळ जनावर खरेदी केल्याचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

एका व्यक्तीने बनावट कागदपत्रांच्या आधारे अनुदानाचा लाभ घेतला होता. सदर बाब निदर्शनास आल्यावर नोटीस देऊन अनुदानाची वसूली केली आहे.

या प्रकरणातील संबंधित पशुधन पर्यवेक्षक व पशुधन विकास अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सरवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावातील अवैध रेती उपसा रोखण्याबाबत**

**(२०) * २८२७८ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागाने बेकायदा रेती उपसा करणाऱ्या वाळू तस्कारांविरोधात कारवाई करण्यासाठी विविध मोहिमा सुरु केल्या असतांनाही सरवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावाच्या खाडीकिनारी काही महिन्यांपासून रेती उपसा चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहाटे ३ वाजल्यापासून वाळूमाफिया सरवली भागात रेतीचा उपसा करण्यासाठी सक्शन पंप, बोटी घेऊन खाडीत उतरतात व महसूल विभागाचे कार्यालय सुरु झाले की, अगदी सकाळी ११ वाजेपर्यंत हा रेती उपसा थांबविला जातो. बाहेर काढलेली रेतीची तात्काळ विल्हेवाट लागली जाते, शासकीय कार्यालयांना सलग २-३ दिवस सुट्टी असली तसेच दुसरा व चौथा शनिवार असला की, या भागातील रेती उपसा २४ तास चालू असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफियांवर कारवाई करून अवैधरित्या रेती उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे सरवली खाडीकिनारी सुट्टीच्या दिवशी वाळू तस्कराकडून रेतीचा उपसा अशा आशयाची बातमी एका वृत्तपत्रात दिनांक २३/१२/२०१६ व दिनांक २७/१२/२०१६ रोजी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने दिनांक २७/१२/२०१६ रोजी सुटीच्या दिवशी सकाळी ७ वाजल्या पासून भरारी पथकामार्फत संपूर्ण खाडी किनारी फिरून रेती उपसाबाबत चौकशी केली असता, सदर ठिकाणी रेती उपसा झाला असल्याचे तसेच रेतीसाठा निदर्शनास आला नाही.

भिवंडी तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकांमार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. सदर पथकांनी २०१६-१७ मध्ये भिवंडी तालुक्यातील रेती बंदरावर केलेल्या तपासणीत निदर्शनास आलेल्या अवैध रेती उत्खननाच्या १४ प्रकरणांत गुन्हे दाखल केले असून, एकूण २०४७ ब्रास रेतीसाठा, ३ सक्शन पंप व २ मोटरपंप जप्त केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांवर स्वस्त औषधांची दुकाने उपलब्ध करून देण्याबाबत

**(२१) * २९०२६ श्री.आनंदराव पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाने प्रत्येक बस स्थानकावर राज्यातील गरजू रुग्णांना स्वस्त औषधे (जेनेरिक औषध दुकान) उपलब्ध करुन देण्याचा निर्णय मा.परिवहन मंत्री यांनी घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि बी.पी.पी.आय. यांच्यात बस स्थानकांवर स्वस्त औषधाची दुकाने सुरु करण्यासंदर्भात सामंजस्य करारावर मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मान्यता मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून स्वस्त औषधांची दुकाने बस स्थानकावर उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या ५९७ बसस्थानकांवर जेनेरिक औषध विक्री सुरु करण्याबाबतच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर ते रत्नागिरी या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाबाबत**

**(२२) * २७१९२ श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते रत्नागिरी व्हाया तुळजापूर या नव्या सिमेंट कॉँक्रीट महामार्गासाठी केंद्रीय परिवहन मंत्रालयाने रुपये आठ हजार कोटी मंजूर केलेले असून हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण अशा चार विभागातून जात असल्याने त्याची विभागणी ९ टप्प्यात करण्यात आलेली आहे व या महामार्गासाठी कराव्या लागणाऱ्या भूसंपादनासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाकडे रुपये चार हजार कोटीचा निधी उपलब्ध करून दिल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या राष्ट्रीय महामार्गामुळे बाधित होणाऱ्या जमीन मालकांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर ते रत्नागिरी व्हाया तुळजापूर हे अंतर ९४१ कि.मी. आहे. त्यामध्ये तीन राष्ट्रीय महामार्ग असून नागपूर (बुट्टीबोरी) ते तुळजापूर ह्या (५२५.०० कि.मी.) राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ च्या चौपदरीकरणाचे काम केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत ८ भागामध्ये हाती घेण्यात आले असून त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ (जुना २११) च्या तुळजापूर ते सोलापूर ह्या ४७.०० कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ च्या सोलापूर ते रत्नागिरी ह्या ३६९ कि.मी. महामार्गापैकी सोलापूर ते सांगली व कोल्हापूर ते रत्नागिरी ह्या भागांच्या चौपदरीकरणासाठी भूसंपादनाची कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे. उर्वरीत सांगली ते कोल्हापूर ह्या ६२ कि.मी.

रस्त्याच्या चौपदरीकरणाचे राज्य शासनामार्फत खाजगीकरणामधून हाती घेतलेले काम ७० टक्के पूर्ण झाले असून हा भाग सुध्दा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

ह्या सर्व प्रकल्पांसाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार भूसंपादन करण्यात येणार असून RFCTLARR Act २०१३ मधील तरतुदीनुसार मोबदला देण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळाने नवीन बसेस एसटी कार्यशाळेत तयार न करता बाहेरून तयार करुन घेण्याचा घेतलेला निर्णय**

**(२३) * २९५०६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने नवीन बसेस एसटी कार्यशाळेत तयार न करता बाहेरून तयार करून घेण्याचा निर्णय घेतला असून सदर कामाकरिता चार महिन्यांपूर्वी निविदा प्रकिया राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रकियेनंतर अद्यापही १५०० नवीन बसेस एसटीत दाखल झालेल्या नाहीत, तसेच नवीन बसेस येण्यास विलंब होत असल्याने प्रवाशांना जुन्या बसमधूनच प्रवास करावा लागत असून बसेसच्या कमतरतेमुळे ऐन गर्दीच्या हंगामात प्रवाशांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी नवीन बसेस एसटीच्या कार्यशाळेत तयार करून त्या ताफ्यात आणल्या जात असतांनाही यावर्षी बाहेरून बसेस तयार करून घेण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यशाळांमध्ये साधी, निमआराम इ. बसेसची बांधणी तसेच जुन्या बसेसचे पुन:स्थितीकरण करण्यात येते. परंतू, महामंडळाच्या कार्यशाळेत वातानुकूलित बसेस तयार होत नसल्याने वातानुकूलित ५०० बसेस बाहेरुन तयार करुन घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

राज्य परिवहन महामंडळाकडे पुरेसा चालनीय वाहन ताफा उपलब्ध असल्याने प्रवाशांची गैरसोय होत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील एसटी स्थानके आधुनिक बसतळांसह व्यापारी संकुल उभारण्याबाबत**

**(२४) * २७०२१ श्री.संजय दत्त, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाने राज्यातील एसटी स्थानके आधुनिक बसतळांसह व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील एसटी स्थानके आधुनिक बसतळांसह व्यापारी संकुल उभारण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.
(२) राज्य परिवहन महामंडळाकडून दिनांक ०७/०१/२०१७ रोजी पनवेल, बोरीवली-नॅन्सी कॉलनी, पुणे-शिवाजी नगर, सोलापूर-पुणे नाका, नाशिक महामार्ग, औरंगाबाद-मध्यवर्ती, नांदेड-मध्यवर्ती, अकोला व नागपूर-मोरभवन या ९ ठिकाणच्या प्रकल्पांसाठी ई-निविदा मागविलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील आत्महत्याग्रस्त**
**शेतकऱ्यांच्या कुंटूबियांना आर्थिक मदत करण्याबाबत**

**(२५) * २९२११ श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २४३७२ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणदेहरे (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील शांताराम तानाजी बच्छाव या शेतकऱ्याने नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतात गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ या वर्षात जिल्हयात ८५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुंटूबियांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) दिनांक २३/१/२००६ च्या शासन निर्णयानुसार पात्र प्रकरणी रूपये १ लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात येते. वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हयामध्ये पथदर्शी प्रकल्प बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घणसोली (नवी मुंबई) येथील खाडीकिनारी अनधिकृत इमारती उभारल्याबाबत**

**(२६) * २९४०२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घणसोली (नवी मुंबई) येथील खाडीकिनारी मोठया प्रमाणात डेब्रिज टाकून त्यावर बेकायदा इमारती निर्माण करून भूमाफियांकडून यातील घरे विक्री अथवा भाडे करारावर देण्याचे काम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोठिवली येथील मोकळ्या भूखंडावर खाडीकिनाऱ्यावरील खारफुटीची जागा भूमाफीयांकडून बळकवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू खारफुटीच्या जागेवरील अनधिकृत होत असलेल्या बांधकामांवर व विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) घणसोली गावाशेजारी सिडको महामंडळाच्या भुखंडावर बेकायदा चाळी बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या अनधिकृत बांधकामावर सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेकडून माहे जानेवारी, २०१७ मध्ये निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही,
गोठिवली, घणसोली खारफुटीचे क्षेत्र संरक्षित असून या जागांवर कोणतेही अतिक्रमण झाले नसून ही जागा मुंबई कांदळवन संधारण घटकाच्या ताब्यात आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विविध मार्गावरील थांबे चालक मनमानी पध्दतीने अल्पोपहाराचे दर आकारून प्रवाशांची लूट करीत असल्याबाबत**

**(२७) * २८१७१ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध मार्गावर अल्पोपहारासाठी २२ परवाने महामंडळाने दिले असून सदर आदेशानुसार प्रवाशांना ३० रूपयात चहा आणि नाश्ता देण्याचे आदेश महामंडळाने संबंधित थांबे चालकांना दिले असतांनाही त्याचे उल्लघंन करून अनेक थांबे चालक मनमानी पध्दतीने दर आकारून प्रवाशांची लूट करीत असल्याच्या अनेक तक्रारी शासनास प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषी थांबे चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) राज्यातील विविध मार्गावर प्रवाशांना जेवण तसेच अल्पोपहारासाठी एकूण २७ थांबे दिले असून सदर थांब्याचा करारनामा करतांना करारनाम्यामध्ये हॉटेलमधील खाद्य पदार्थांची दर सूची हॉटेलच्या प्रथमदर्शनी भागावर लावणेस तसेच रु.३०/- मध्ये चहा अधिक अल्पोपहार देण्याबाबतच्या अटींचा समावेश करण्यात आला आहे. ज्या हॉटेल चालकांकडून सदर अटींचे उल्लंघन केले जाईल अशा हॉटेल चालकांचा थांबा रद्द करण्याच्या सूचना विभागांना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे मुंबई-पुणे मार्गावरील हॉटेल 'फुडमॉल', पुणे-भोर-महाड मार्गावरील हॉटेल 'आयुषा', तसेच पुणे-नाशिक मार्गावरील हॉटेल 'इंद्रप्रस्थ' यांनी प्रवाशांना रु.३०/- मध्ये चहा अधिक अल्पोपहार देण्याच्या अटीचे उल्लंघन केल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाद्वारे त्यांचा थांबा तात्काळ रद्द करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(२८) * २९८४२ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये राज्यातील शेतकऱ्यांना सहभागी होता यावे यासाठी दिनांक १० जानेवारी, २०१७ पर्यत मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये मुदतवाढ दिल्यामुळे राज्यातील किती शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा झालेला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) नॅशनल इन्शुरन्स कंपनीमार्फत प्राप्त अंतरीम अहवालानुसार प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०१६-१७ मध्ये एकूण ७.०४ लाख शेतकऱ्यांनी भाग घेऊन २.४७ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केलेले आहे. त्यापैकी मुदतवाढीच्या दिनांक १ जानेवारी, २०१७ ते १० जानेवारी, २०१७ या कालावधीत विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांचा तपशील कंपनीमार्फत बँकांकडून संकलित करण्यात येत आहे.

(३) केंद्र शासनाच्या सुचनांनूसार राज्य शासनाने रब्बी हंगाम २०१६-१७ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होणेची अंतिम मुदत दिनांक १० जानेवारी, २०१७ पर्यन्त वाढविणेचा शासन निर्णय क्र.प्रपीवियो-२०१६/प्र.क्र. ३२६/११-अे, दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ प्रसिध्द केला. वाढीव कालावधीत शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव स्विकारणेबाबत विमा कंपनीस आदेशीत केले. विमा कंपनीने सदर कालावधीत विमा प्रस्ताव स्विकारलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा व घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(२९) * २८३०१ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा व घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात कडाक्याच्या थंडीमुळे तुरी पिकांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजीच्या एनडीआरएफच्या निर्णयाप्रमाणे थंडीमुळे होणारे पिकांचे नुकसान हे नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत असल्याने शेतकऱ्यांना मदत अनुज्ञेय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पिकांचे सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या धर्तीवर SRA योजनेंतर्गत लागू करण्यात आलेली अधिसूचना ठाणे जिल्हयासाठी लागू करण्याबाबत

**(३०) * २७८७७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे सन १९९५ पासून झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRD) लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर दिनांक १९ डिसेंबर, १९९७ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार केवळ मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्ह्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) या नावाने ही योजना लागू करण्यात आली असून सदरहू अधिसूचनेनुसार करार, साठेकरार/ साठेखत/खरेदीखत तसेच भाडेकरार/ भाडेपट्टा या दस्तऐवजाकरिता मुद्रांक शुल्क म्हणून रुपये १००/- इतके शुल्क आकारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरासाठी लागू करण्यात आलेली सदरची सन १९९७ ची अधिसूचना ठाणे शहरासाठी लागू करण्यात आली नसल्यामुळे ठाण्यामधील झोपडपट्टीधारकांना शैक्षणिक, व्यवसायिक कर्ज व अन्य कारणांसाठी वित्तीय सहाय्याची गरज भासल्यास बँका अथवा वित्तीय संस्था कर्ज देत नाहीत, त्यामुळे सध्याच्या SRD या योजनेंतर्गत ठाणे येथे एकही रजिस्ट्रेशन (नोंदणी) झालेली नाही तसेच सन २०११ पासून एकतर्फी रजिस्ट्रेशन देखील बंद करण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये व त्यानंतर माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सन २०१४ मध्ये शासनाने ठाणेकरिता SRD ऐवजी SRA योजना लागू असताना मात्र मुंबईसाठी निर्गमित केलेली अधिसूचना ठाणे शहरासाठी लागू न केल्याने तोपर्यंतच्या कालावधीत ज्या योजना पूर्ण झाल्या आहेत किंवा अपूर्ण असुन सुध्दा विकासक सदनिका नोंदणीसाठी प्रतिसाद देत नसतील तर अशा प्रकरणांमध्ये सदनिका नोंदणीसाठी प्राधिकरणातील अधिकाऱ्यांना प्राधिकृत करुन नोंदणी प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच मुंबईच्या धर्तीवर SRA योजनेंतर्गत लागू करण्यात आलेली सन १९९७ ची अधिसूचना ठाणे जिल्हयासाठी तातडीने लागू करावी अशीही आग्रही मागणी गेल्या ५ वर्षापासून ते आजतागायत ठाणेकर जनतेकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत अहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) ठाणे महानगरपालिका हद्दीत झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRD) अंतर्गत पहिला प्रस्ताव १९९५ मध्ये मंजूर करण्यात आला होता. तथापि, दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ च्या शासन अधिसूचनेच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांचे पुनर्वसन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA), मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

(२) महसूल व वन विभागाच्या दिनांक १९ डिसेंबर, १९९७ रोजीच्या शासन आदेशानुसार मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर क्षेत्रातील झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतच्या मिळकतींकरिता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुच्छेद ५ (ग-अ), २५ व ३६ अन्वये देय असलेले मुद्रांक शुल्क रू.१०० पर्यंत कमी करण्यात आले आहे. हे खरे आहे.

परंतु, उपरोक्त अधिसूचनेद्वारे मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हयांकरिता झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) लागू करण्यात आली हे म्हणणे खरे नाही.

(३) उक्त दिनांक १९ डिसेंबर, १९९७ रोजीच्या मुद्रांक शुल्क सवलतीविषयक आदेशामध्ये ठाणे शहराचा समावेश नव्हता हे खरे आहे. तथापि, दिनांक ४/३/२००८ रोजीच्या शासन आदेशान्वये ठाणे महानगरपालिका क्षेत्रासह एकूण ८० शहरातील झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन

योजनेंतर्गतच्या मिळकतींकरिता देखील महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुच्छेद ५ (ग-अ), २५ व ३६ अन्वये देय असलेले मुद्रांक शुल्क रूपये १०० पर्यंत कमी करण्यात आले असल्याने त्यानुसार यासंबंधीत दस्तऐवजांची नोंदणी होत आहे.

(४) व (५) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतच्या मिळकतींकरिता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुच्छेद ५ (ग-अ), २५ व ३६ अन्वये देय असलेले मुद्रांक शुल्क रू.१०० पर्यंत कमी करण्यासंदर्भातील शासन आदेश दिनांक ०४/०३/२००८ पासून लागू असून ते पूर्वलक्षी प्रभावाने मुंबईच्या धर्तीवर सन १९९७ पासून लागू केल्यास अन्य शहरातूनही तशी मागणी होऊन राज्य शासनाचे मोठया प्रमाणात महसूली नुकसान संभवत असल्याने उक्त विनंती मान्य करणे शासनास संयुक्तिक वाटत नाही.

-----------------

**अलिबाग-मांडवा-रेवस (जि.रायगड) या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३१) * ३००८६ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयंत पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग-मांडवा-रेवस (जि.रायगड) या राज्यमार्गाची पावसाळ्यात दुरवस्था झालेली असून अद्यापपर्यंत त्याची दुरूस्ती करण्यात आलेली नसल्यामुळे या धोकादायक मार्गावरून सुमारे ७० गावांतील ग्रामस्थांना प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग (ता.अलिबाग, जि.रायगड) यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) होय.

(३) रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील वाळू पट्टयातील वाळू परिणामापेक्षा अधिक निर्गत होत असल्याबाबत**

**(३२) * २९१५५ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील वाळू पट्यातील वाळू दिलेल्या पासापेक्षा ओव्हरलोडने निर्गत केली जात असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी सदर बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तहसिलदार, कुडाळ यांच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब तहसिलदार कुडाळ यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे दिसून येत नाही. तथापि, वाळूपट्यातील वाळू वाहतूक परिमाणापेक्षा अधिक निर्गत होणार नाही याकडे लक्ष ठेवण्याबद्दल व नियमांचे उल्लंघन करून वाळूची वाहतूक होत असल्याचे आढळल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्याबद्दल तहसिलदार, कुडाळ यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत**

**(३३) * २९५९७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कोंड-उमरे येथील खाडीपात्रातील मोठया प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा होत असल्यामुळे खाडीची व नदीपात्राची धूप होत असून शेती व बागायतीचे तसेच परिसरातील घरांचे नुकसान होत आहे, तसेच परिसरातील रस्त्यांची सुध्दा दुरवस्था होत असल्याने अवैध वाळू उपसा थांबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी शासनाकडे मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कोंड-उमरे, ता.संगमेश्वर येथील ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रश्नात नमूद केल्यानुसार शासनाकडे मागणी केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, कोंड-उमरे येथील ग्रामस्थांनी तहसिलदार संगमेश्वर यांच्याकडे दिनांक ०७/११/२०१६ व दिनांक १८/११/२०१६ रोजी मौजे कोंड-उमरे येथील नदीतून अवैधरित्या होत असलेल्या वाळूच्या उत्खननाबाबत निवेदन दिले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी फणसवणे यांनी सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील व तलाठी यांच्यासमवेत सदर नदीपात्रामध्ये पाहणी केली असता, मौजे कोंड-उमरे येथे वाळूचे अवैध उत्खनन झाल्याचे व त्यामुळे नदीपात्राची धुप होऊन शेती व बागायतीचे तसेच परिसरातील घरांचे व रस्त्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

संगमेश्वर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत तलाठी व मंडळ अधिकारी यांना सूचना देण्यात येऊन भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोर-विक्रमगड-जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३४) * २७०८६ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर-विक्रमगड-जव्हार (जि.पालघर) येथील रस्त्यांचे माहे मार्च-एप्रिल, २०१६ मध्ये नुतनीकरण व दुरूस्तीचे काम करूनही पहिल्याच पावसात रस्त्यांची दुरवस्था झाली असून रस्त्यात मोठे खड्डे पडून जिवित व वित्त हानी झाल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांच्या बांधकामासाठी किती रक्कमेची निविदा काढण्यात आली होती व कोणत्या ठेकेदारास बांधकामाचे काम देण्यात आले होते,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याच्या ५ कामांच्या निविदा बोलावण्यात आल्या होत्या. या निविदांची एकूण किंमत रु. २६२.३० लक्ष इतकी आहे. या सर्व कामासाठी निम्नतम देकार मे.जिजाऊ कन्स्ट्रक्शन विक्रमगड यांचे प्राप्त झाले होते व स्वीकृत करण्यात आले. विहीत नियमानुसार कार्यारंभ आदेश देऊन सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील नव्या धोरणामुळे अनेक चालक-वाहक भरतीपासून वंचित राहणार असल्याबाबत

**(३५) * २८६२९ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळात होणाऱ्या भरतीत नव्या धोरणामुळे हजारो रुपये खर्च करुन बॅच (बिल्ला) घेतलेले अनेक चालक-वाहक या भरतीपासून वंचित राहणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बॅच (बिल्ला) धारक चालक-वाहक यांना सदर भरती प्रक्रियेत पात्र होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे पर्यवेक्षकीय व घटक संवर्ग पदांमधील एकूण १४२५३ पदे भरण्याकरीता दिनांक ५/०१/२०१७ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसारित करण्यात आली असून त्यामध्ये चालक तथा वाहक (कनिष्ठ) या प्रवर्गातील ७९२९ पदांसाठी जाहिरात देण्यात आली आहे. चालक तथा वाहक (कनिष्ठ) या पदासाठी चालक व वाहक बॅच (बिल्ला) असणे आवश्यक असल्याची अट समाविष्ट करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस पुरेसा प्रतिसाद मिळून चालक तथा वाहक (कनिष्ठ) या पदासाठी एकूण २८२७२ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील तलाठी सज्जा कार्यालयातील बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(३६) * २९४४२ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील तलाठी सज्जा कार्यालय शहरापासून एक किलोमीटर लांब कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयाजवळ असल्याने शेतकरी, विदयार्थी, ज्येष्ठ नागरिक कामाकरीता पायपीट प्रवास करुन आले असता तलाठी किंवा मंडळ अधिकारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात भेटत नसल्यामुळे नागरिकांना आपली कामे पूर्ण करून घेण्यास त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील तलाठी सज्जा कार्यालयातील बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करून नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) याबाबतची लेखी तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, उपविभागीय अधिकारी कार्यालय बिलोली व तहसिल कार्यालय, बिलोली येथे प्राप्त झालेली नाही.

(२) नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुका येथील कुंडलवाडी सज्जाचे नियमित तलाठी हे वैद्यकिय कारणास्तव रजेवर असल्यामुळे कुंडलवाडी सज्जा येथील तलाठी पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या हुनगुंदा येथील सज्जाचे तलाठी यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. हुनगुंदा सज्जाचे नियमित तलाठी हे कुंडलवाडी सज्जाचे कामकाज हाताळण्याकरिता तेथे एक दिवस आड जात असतात. कुंडलवाडी सज्जाकरिता नियमित तलाठ्याची नियुक्ती करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, बिलोली यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गिरणा प्रकल्पातील (जि.नाशिक) पुनर्वसित**
**गावठाणांमध्ये नागरी सुविधा देण्याबाबत**

**(३७) * २७८२६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४३३२ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा प्रकल्पातील (जि.नाशिक) पुनर्वसित गावठाणांमध्ये पुनर्वसनाच्या नागरी सुविधा कामांना सन २०१६-२०१७ मध्ये प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त परंतु जुन्या दर सुचीनुसार आधारीत असलेली अंदाजपत्रके चालु दर सुचीनुसार परिगणित करून फेरसादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प यंत्रणेकडून सुधारित दर सुचीनुसार परिगणित प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त झालेल्या व विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, गिरणा प्रकल्पातील पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सदरील अंदाजपत्रक प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली आहे काय,

(४) असल्यास, अंदाजपत्रक प्रस्तावानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षामध्ये प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त परंतू, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात न आलेले प्रस्ताव सन २०१६-२०१७ मध्ये चालु दरसुचीनुसार परिगणित करुन फेरसादर करण्याचे निर्देश दि. २७/०४/२०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आले होते.

(२), (३) व (४) होय, सदर प्रस्तावास दि. २७/१२/२०१६ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांच्या मदतीमध्ये भरीव वाढ करण्याबाबत

**(३८) * २७९९०  श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना इतर राज्यांमध्ये चार लाख नुकसान भरपाई मिळते त्याप्रमाणे शासनाने राज्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या मदतीमध्ये वाढ करावी असे मा.उच्च न्यायालयाने शासनास दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातील आत्महत्या शेतकऱ्यांच्या वारसांच्या मदतीमध्ये भरीव वाढ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारत दुरूस्ती कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३९) * २७३३९ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला या इमारतीच्या दुरूस्तीचे खोटे देयके सादर करून शासकीय निधीचा अपहार केल्याचे चौकशी अहवालात नमुद करण्यात येऊनही दोन वर्षानंतरही दोषींवर कारवाई झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शहर कोतवाली पोलीस स्टेशन, अकोला येथे अपहार प्रकरणी दाखल झालेल्या बाबीवर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या अधिक्षक अभियंत्यांनी एक सदस्यीय समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे हे खरे आहे.

अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांनी सखोल चौकशी केली असून त्यांचे चौकशी अहवालात सदर प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नसल्याचे निष्कर्ष नोंदविलेले आहेत, त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) अधिक्षक अभियंता यांनी अन्य उपअभियंत्यामार्फत तपासणी व चौकशी करुन घेतली. तथापि, त्यानंतर अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांच्याकडून वरीलप्रमाणे सखोल चौकशी करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील पाटेगाव ते दादेगाव या रस्त्यांचे काम निष्कृट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४०) * २९३३७ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील संत एकनाथ महाराज पालखी मार्ग असलेल्या पाटेगाव ते दादेगाव या नवीन रस्त्यांचे काम निष्कृट दर्जाचे झाल्याबाबत स्थानिक नागरिकांनी शासनाकडे तक्रारी केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हे दाखल करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच रस्त्याचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) प्रश्नांकित रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीमधील भागाचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाचे कंत्राट निश्चित करण्यात आले आहे. कामासाठी आवश्यक बांधकाम साहित्य जमा करण्याचे काम प्रगतीत आहे. काम अद्याप सुरू व्हावयाचे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावरोळी-खारपाडा (ता.खालापूर, जि.रायगड) मार्गावरील दगडखाण बंद करण्याबाबत**

**(४१) * २७३७६ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरोळी-खारपाडा (ता.खालापूर, जि.रायगड) मार्गावरील दगडखाणीला सुरुंग लावण्यात येत असल्याने मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावरील बोगद्याची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दगडखाण बंद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे माडप, ता.खालापूर येथील ग्रामस्थाचे मौजे माडप गावात सुरु असलेले बेकायदेशीर दगडखाण व स्टोन क्रशर बंद करण्याबाबतचे निवेदन शासनाकडे जानेवारी, २०१७ मध्ये प्राप्त झाले आहे.

उपविभागीय अधिकारी खालापूर विभाग व तहसिलदार खालापूर यांनी मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावरील माडप बोगद्याची पाहणी केली असून, दगडखाणीतील प्रत्यक्ष उत्खनन क्षेत्र व उक्त बोगद्याचे सुरुवातीचे ठिकाण यामधील अंतर ५०२ मी. असल्याचे दिसून आले आहे.

सदर बोगद्याला दगडखाणीमुळे धोका संभवतो किंवा कसे, याबाबत डायरेक्टर जनरल ऑफ माईन्स सेफ्टी, जियॉलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच नियमानुसार उचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) * २९५९८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात ४९ मंजूर तलाठी पदांपैकी २४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) जळगांव जिल्हयात तलाठयांची एकूण ५२६ पदे मंजूर आहेत. शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे, जिल्हयातील तलाठी संवर्गातील ९९ रिक्त पदांपैकी ५० टक्के पदे भरण्याच्या दृष्टीने ५० तलाठी पदांच्या पदभरतीची जाहिरात जिल्हाधिकारी यांच्याकडून काढण्यात येवून त्यापैकी ४३ उमेदवारांना तलाठी पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. उर्वरीत ७ उमेदवार विशिष्ट प्रवर्गातील असल्यामुळे त्यांची प्रमाणपत्रे पडताळणीनंतर त्यांना तलाठी पदी नियुक्ती देण्यासंदर्भातील विहित कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील रेल्वे प्रकल्पासंदर्भात**

**(४३) * २७७६७ श्री.नारायण राणे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ९ रेल्वे प्रकल्पांसाठी रूपये २२ हजार कोटी खर्च करण्यात येणार असून शासनाच्या ५० टक्के समभागातून हे प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पांचे प्रकल्प आराखडे राज्य शासनाने तयार केले आहेत काय,
(३) असल्यास, यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही. रेल्वे मंत्रालयाने मंजूर केलेल्या ८ प्रकल्पांची सद्यस्थितीतील अंदाजित किंमत रक्कम रुपये ११,७६०/- कोटी असून त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा हा रक्कम रुपये ५,६३०/- कोटी इतका आहे. वर्धा-नांदेड प्रकल्प (४०%) वगळता उर्वरित ७ प्रकल्पांमध्ये राज्य शासन खर्चातील ५०% सहभाग देत आहे.
(२) नाही. संबंधित प्रकल्पांचे सर्वेक्षण अहवाल व तांत्रिक आराखडे रेल्वे मंत्रालयामार्फत तयार केले जातात.
(३) होय. सन २०१६-१७ साठी रुपये ५७२.५२ कोटीची तरतूद करण्यात आली होती. तर सन २०१७-१८ साठी रुपये ४७५.०० कोटी नियतव्यय मंजूर करण्याबाबत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सुरबोडी (ता.पवनी, जि.भंडारा) गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४४) * २९११७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरबोडी (ता.पवनी, जि.भंडारा) गावाचा पुनर्वसनाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून पावसाळ्यामध्ये वैनगंगेला येणाऱ्या पुरामुळे सुरबोडीत जिवीतहानी होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात पुराच्या पाण्यामुळे तेथील नागरिकांना विविध आजाराची लागन होत असल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सुरबोडी गावाचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत सुरबोडी हे गाव पुर्णत: प्रकल्पबाधित नसल्यामुळे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या तरतूदीनूसार या गावाचे पुनर्वसन करता येणार नाही. तथापि सुरबोडी गावाच्या पुनर्वसनास "विशेष बाब" म्हणून मान्यतेसाठीचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या अभिप्रायासह पुनर्वसन प्राधिकरणासमोर सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यातील खारपाणपट्टयातील शेती तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४५) * २९३३० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यातील खारपाणपट्टयांतील ४ लाख ७० हजार हेक्टरवर शेती करण्यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाने खारपाणपट्टयातील शेतीच्या विकसित केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार खारपाणपट्टयातील शेती विकसित तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत खारपाणपट्टयातील शेती करीता विविध कृषी तंत्रज्ञान विकसित केलेले आहे व सदर तंत्रज्ञानाची माहिती विद्यापीठस्तरावर विविध कार्यक्रमांव्दारे कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समिती, ॲग्रोटेक, कृषी मेळावे, चर्चासत्र, सभा, कृषी संवादिनी, माहितीपत्रके, वर्तमानपत्रांव्दारे पुरविण्यात येते. तसेच याच माध्यमातून सदर तंत्रज्ञान शेतकऱ्यांना पुरविण्यात येते.

परंतु याबाबत आजतागायत कुठल्याही शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४६) * २७३२६ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, डॉ.अपूर्व हिरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंदराव पाटील : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक २२१०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुसंवर्धन विभागातील गट-अ, ब, क, व ड या संवर्गातील २१२९ पदे रिक्त असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) पशुसंवर्धन विभागात गट-अ, ब, क व ड संवर्गात एकूण ६८३८ मंजूर पदांपैकी सद्य:स्थितीत २१५८ पदे रिक्त आहेत.

(२) गट-अ व ब संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग/का-१६ब यांनी आरक्षण निश्चित करुन दिले आहे. त्यानुसार पदोन्नती देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील १९१ रिक्त पदांपैकी १०० पदे भरण्यास प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४/०२/२०१७ रोजी आयोजित बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. सदर १०० पदे व अ.ज प्रवर्गातील अनुंशेषाची १९ पदे भरण्याकरीता सामान्य प्रशासन विभागाने आरक्षण निश्चित करुन दिले असून त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात येत आहे.

गट-क संवर्गातील सरळसेवेच्या कोटयात रिक्त असलेली १३८ पदे भरण्यासंदर्भात सक्षमप्राधिकारी म्हणून आयुक्त पशुसंवर्धन यांच्यास्तरावर कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे गट-ड संवर्गातील २६९ रिक्त पदे भरण्यासंदर्भात उमेदवारांची लेखी परिक्षाव्दारे निवड करण्यात आली असून गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना पदस्थापना देण्याबाबतची कार्यवाही सक्षमप्राधिकारी म्हणून संबंधित प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त यांच्यास्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दीर्घकालीन भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनींबाबत

**(४७) * २६८७६ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिर्घकालीन भाडेपट्ट्यावर विविध उद्योगांना शासकीय भाडेपट्टयाच्या हजारो (लीज) जमिनींची मुदत संपलेली असून मुंबई शहर जिल्हयातील सुमारे १२८२ व मुंबई उपनगर जिल्हयात २९५ लीजच्या जमिनी असून मुंबई शहर जिल्हयातील ६९२ व मुंबई उपनगर जिल्हयातील १४९ जमिनींच्या भाडेपट्ट्याचा कालावधी संपलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनींच्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरणही करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) विविध प्रयोजनासाठी भाडेपट्याने दिलेल्या शासकीय मिळकतींपैकी मुंबई शहर जिल्ह्यातील १३०७ पैकी ६६९ मिळकतींच्या भाडेपट्याची व मुंबई उपनगर जिल्ह्यातील ३५६ पैकी १४९ मिळकतींच्या भाडेपट्याची मुदत संपुष्टात आलेली आहे.

(२), (३) व (४) शासन निर्णय क्र.जमीन-२५०५/प्र.क.४०५/ज-२, दि.१२/१२/२०१२ अन्वये भाडेपट्याने दिलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्याचे नुतनीकरण करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले असून त्यातील तरतुदींनुसार भाडेपट्टेधारकांना भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत अथवा भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ मध्ये रुपांतरीत करुन घेण्याच्या विकल्पाबाबत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. ज्या भाडेपट्टेधारकांकडून याबाबतचे विकल्प सादर करण्यात आले आहेत त्यांचेबाबत भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच अधिकाधिक मिळकतींच्या भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भाडेपट्टाधारकांना विविध माध्यमांद्वारे आवाहन करण्यात येत आहे. भाडेपट्टा नुतनीकरणास चालना देण्यासाठी शासन शुध्दीपत्र क्र.जमीन-२५०५/प्र.क्र.४०५/ज-२, दि.२०/८/२०१६ अन्वये शासनाची पूर्वमान्यता घेण्याची तरतुद वगळण्यात येऊन भाडेपट्टा नुतनीकरणाचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

-----------------

**राज्यात विशेषत: सिंधुदूर्ग जिल्हयात 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात' विमा योजनेचा शेतक-यांना लाभ देण्याबाबत**

**(४८) * २७०३४ श्री.संजय दत्त, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीमध्ये काम करताना अपघातामध्ये जीव गमावलेल्या किंवा गंभीर जखमी झालेल्या शेतकऱ्यास आर्थिक मदत देण्यासाठी "गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात" विमा योजना शासनाने राबविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत सन २०१५-१६ या वर्षात विमा कंपनीकडे सिंधुदूर्ग जिल्ह्यातून दाखल झालेल्या ६७ प्रस्तावांपैकी फक्त १४ प्रस्ताव मंजूर झाले असून ४१ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात' विमा योजनेंतर्गत विमा कंपनीकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तसेच राज्यातील या योजनेंतर्गत अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रस्तांवामधील आवश्यक ती कागदपत्रांची पुर्तता करुन लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२) फेब्रुवारी, २०१७ अखेरच्या अहवालानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७६ प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल करण्यात आलेले होते. त्यापैकी १९ प्रस्ताव विमा कंपनीने मंजूर केलेले असून व ५ विमा प्रस्ताव नाकारण्यात आलेले आहेत तर ५२ प्रस्तावांवर कार्यवाही चालू आहे.
(३) राज्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत दि.२३/२/२०१७ अखेर २९१० प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल झाले असून त्यापैकी ११७२ विमा प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. २६८ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत. तसेच १४७० विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे प्रलंबित आहेत.
(४) प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होणेसाठी जिल्हास्तरावर तसेच कृषी आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या बैठका घेऊन सातत्याने प्रकरणे निकाली काढणेस्तव सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगुळवाडी-नावळे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत

**(४९) * २९४६६ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगुळवाडी-नावळे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) या रस्त्याचे माहे मे, २०१६ मध्ये करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांनी सदरचे काम रोखले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदूर्ग जिल्हयाचे मा.पालकमंत्री यांनी सदर प्रकरणी कंत्राटदारावर कारवाई करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकित कामामधील ८४० मी. लांबीच्या रस्त्याचे प्रिमिक्स कारपेटचे काम स्वीकृत निविदेप्रमाणे हॉटमिक्स हॉट लेड पध्दतीने करण्याऐवजी कोल्डमिक्स पध्दतीने केले आहे. काम प्रगतीत असताना नागरीकांनी बंद पाडले होते.
(२) कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांना कोणतेही लेखी आदेश प्राप्त झालेले नाहीत.
(३) काम निविदा शर्तीप्रमाणे केले नसल्याने ठेकेदारांना नोटीस देण्यात आली आहे. ठेकेदारांचे कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी-सातारा जिल्हयांना जोडणाऱ्या निवळी-नेदरवाडी घाटाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५०) * २९४५३ श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९९ मध्ये रत्नागिरी-सातारा जिल्हयांना जोडणाऱ्या निवळी-नेदरवाडी घाटाचे काम मंजूर होऊन सदरहू घाटाच्या कामाचे भूमीपूजनही करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगमेश्वरहून नायरी मार्गे निवळी पासून पाटण (जि.सातारा) येथे हा घाट जोडला जाणार असून त्यामुळे ७० ते ८० कि.मी. रत्नागिरी व सातारा जिल्हयातील अंतर कमी होणार आहे, परंतु, सदरहू घाटाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर घाट वाहतुकीसाठी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने घाटाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) राष्ट्रीय महामार्ग क्र.४ कराड ढेबेवाडी-सणबूर-महिंद्र-नाटोशी-मोरगीरी-पाचणी ते नेदरवाडी-नायरी संगमेश्वर-प्रजिमा-५५ रस्ता केंद्र शासनाच्या दि.३/१/२०१७ च्या अधिसूचनेन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ ई असा घोषित करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत संगमेश्वर येथून कराड, सातारा येथे जाण्यासाठी कुंभार्ली घाट व आंबा घाट अस्तित्वात असून यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळातील बस अपघात रोखण्याबाबत**

**(५१) * २८१७८ श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाकडून सन २०१४-२०१६ या कालावधीत झालेल्या अपघातांमध्ये १२६२ व्यक्तिंचा मृत्यू झाला असून यामध्ये १८१ प्रवासी व २९ कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) सन २०१४ ते २०१६ या कालावधीत राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना झालेल्या अपघातांमध्ये २२८ राज्य परिवहन प्रवासी व २७ कर्मचाऱ्यांसह एकूण १५०१ जणांचा मृत्यू झालेला आहे.

(२) राज्य परिवहन महामंडळाच्या चालकांकडून होणारे अपघात रोखण्यासाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महामंडळाद्वारे दिनाक १५/०४/२०१५ पासून राज्य परिवहन मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था येथे अपघात प्रवण चालकांना ७ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

तसेच, मे.वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल्स असोसिएशनतर्फे दिनांक ०१/०२/२०१४ पासून एक दिवसाचे सिम्युलेटर प्रशिक्षण देण्यात येते. चालकांसाठी प्रत्येक विभागामध्ये चालकांच्या सकारात्मक मानसिकतेकरिता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात येऊन त्यांचेव्दारे समुपदेशन केले जात आहे. त्याचप्रमाणे प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्वविद्यालयाच्या प्रशिक्षकांमार्फत आगार पातळीवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करुन चालकांना मार्गदर्शन करुन प्रबोधन केले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महात्मा फुले कृषी विद्यापिठाचे (ता.राहुरी, जि.अहमदनगर)**
**ऊस बेणे निकृष्ट असल्याबाबत**

**(५२) * २९८५१ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापिठाचे (ता.राहुरी, जि.अहमदनगर) ऊस बेणे निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाचे ऊसाचे बेणे वापरल्यामुळे तसेच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निकृष्ठ दर्जाचे बेणे पुरविणाऱ्यांवर कारवाई करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून जानेवारी, २०१७ मध्ये ऊसाचे निकृष्ट दर्जाचे ऊस बेणे शेतकऱ्यांना पुरविण्यात आलेले नाही. बियाणे विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ ते १४ डिसेंबर, २०१६ या कालावधीत ऊसाचे १४,२२,९०० दोन डोळयांच्या टिपऱ्यांचे व

पाडेगाव येथून जानेवारी, २०१७ मध्ये ऊसाचे ७७,८०० दोन डोळयांच्या टिपऱ्यांचे साखर कारखाने आणि शेतकऱ्यांना वितरण करण्यात आले. परंतु याबाबत आजतागायत कुठल्याही कारखान्याची अथवा शेतकऱ्यांची तक्रार संशोधन केंद्रावर प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबोली (जि.सिंधुदूर्ग) घाटाची झालेली दुरवस्था

**(५३) * २९१५६ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आंबोली घाट हा ब्रिटिशकालीन घाट असून दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास या घाट रस्त्यावर ४० फुटांच्या मोरीवर दरड कोसळल्याने घाट वाहतुकीस धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून घाटीची सुरक्षिततेच्या दृष्टीने देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि वाहतूकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी संरक्षक भिंती बांधण्याची व स्पायडर वेब व लोखंडी जाळी बसवण्याची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. घाट रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित आहे.

-----------------

## मु.खामदे, पो.सावली (ता.मुरुड, जि.रायगड) येथील घरकुल धारकांची घरे नियमानुकूल करण्याबाबत

**(५४) * २९६०३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.खामदे, पो.सावली (ता.मुरुड, जि.रायगड) येथील सर्व्हे नं.१/६ या शासकीय जमिनीवर गरीब व बेघर कुंटूंबिय मागील १५ वर्षापासून राहत आहेत, ही घरे नियमानुकूल करण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे तसेच या घरकुलांचा दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी सर्व्हे करण्यात येऊनही या घरकुल धारकांची नोंद करुन त्यांना ७/१२ देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू गरीब व बेघर घरकुल धारकांना ते वास्तव्य करीत असलेल्या जागेची नोंद करून त्यांना ७/१२ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील मौजे खामदे येथील स.नं.१/६ या शासकीय जागेवर १७ लोकांनी निवासी कारणासाठी अतिक्रमण केलेले असून सदरची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची त्यांची मागणी आहे. त्यानुषंगाने सदर जागेची उप अधिक्षक, भूमि अभिलेख, मुरुड यांचेकडून दिनांक ०६/०८/२०१६ रोजी स्थळपाहणी करण्यात आली असून तहसिलदार, मुरुड यांचेस्तरावर प्रकरणाची छाननी सुरु आहे. शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विभागीय आयुक्त यांचे मार्फत शासनास प्राप्त होणे आवश्यक आहे. परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार योग्य तो निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## जव्हार (ता.जव्हार, जि.पालघर) बसस्थानकाच्या परिसरातील खाजगी वाहतुक बंद करण्याबाबत

**(५५) * २७०८८ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन (एसटी) आगाराच्या १०० मीटर परिसरात खाजगी वाहनांना बंदी असताना देखील जव्हार (ता.जव्हार, जि.पालघर) बसस्थानकाच्या परिसरातील अवैध खाजगी वाहतुकीमुळे जव्हार येथील एसटी महामंडळाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जव्हार परिवहन आगार परिसरातील अवैध प्रवासी वाहतूक बंद करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) अवैध प्रवासी वाहतूकीस आळा घालण्याकरीता शासनाने दिनांक १४/०१/२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये कडक कारवाई करण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून दिनांक ०४/११/२०१५ ते दिनांक ३०/०४/२०१६ या कालावधीत जव्हार बसस्थानक परिसरातील एकूण ६७९ खाजगी अवैध वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(५६) * २८६३० श्री.रामहरी रुपनवर, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील प्रमुख बाजारपेठ, शिक्षण आणि दवाखाने असलेल्या वैराग भागातील ५५ खेडयांची सारखी वर्दळ असून बार्शी-सोलापूर मार्गावरील या गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथून जाण्यासाठी असलेल्या रस्त्यापैकी कुर्डूवाडी ते बार्शी रस्ता रहदारीसाठी निकृष्ट झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्यांची दुरूस्ती करून निकृष्ठ बांधकाम करणाऱ्या ठेकेदार व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२) हे खरे नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे. हा रस्ता केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केला. रस्त्याची सुधारणा व दुरुस्तीची कामे केंद्र शासनामार्फत होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय महामार्ग कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५७) * २७८२८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६१०२ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग कार्यालय व त्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण १२०९ पदे मंजुर असून मंजुर पदांपैकी सद्य:स्थितीत फक्त ७९१ पदे कार्यरत असून ४१८ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्गाची असलेली लांबी, तसेच ब्रिटीशकालीन पूल व त्यानंतरच्या कालावधीत झालेली अन्य बांधकामे (Infrastructure) इत्यादी विचारात घेता देखभाल, दुरूस्ती व नुतनीकरणाचे अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग कार्यालय व अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मुख्य अभियंता, (राष्ट्रीय महामार्ग) कार्यालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकुण १२०९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत ७९१ पदे कार्यरत असून एकूण ४१८ पदे रिक्त आहेत.

सदर रिक्त पदांपैकी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गात ३५ कनिष्ठ अभियंत्यांना दि.२७/०१/२०१७ च्या आदेशानुसार सरळ सेवेने नियुक्ती देण्यात आली आहे.

उर्वरित रिक्त पदे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार एप्रिल/मे-२०१७ च्या बदल्यांमध्ये प्राथम्याने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम अदा करण्याबाबत

**(५८) * २७२२० श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-१६ मधील रब्बी हंगामात शेतकऱ्यांच्या पिकांच्या झालेल्या नुकसानीचा पीक विमा शेतकऱ्यांना मिळाला नसून सदर पीक विमा देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) राष्ट्रीय कृषी विमा योजना रब्बी हंगाम २०१५-१६ अंतर्गत राज्यातील ३४.२६ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता व रु. ६२.४० कोटी विमा हप्ता भरून २४.६० लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले होते. त्यापैकी २६.८८ लाख शेतकऱ्यांना रू. ८९३.८२ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम अदा करणेकरीता भारतीय कृषी विमा कंपनीद्वारा ती संबंधित बँकांकडे वर्ग करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन मंडळाच्या बस आगारामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५९) * २९३३८ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने पाचशे आणि एक हजार रुपयांच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील एसटी आगारामध्ये कोट्यवधी रुपयाचा गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दिनांक ८ व ९ नोव्हेंबर, २०१६ या दोन दिवसात वाहकांकडून रोखपालांकडे जमा झालेली रक्कम आणि बँकेत जमा झालेली रक्कम यांच्या तफावत आढळून आल्याने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) केंद्र शासनाने पाचशे व एक हजार रुपयांच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य परिवहन महामंडळाच्या ठाणे, लातूर व बुलढाणा या विभागांतील आगारांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

(२) उक्त प्रकरणी महामंडळाने चौकशी करुन ठाणे विभागातील, ठाणे-१ या आगारातील श्री.मोकाशी, श्री.रामुगडे व श्री.लुगडे या कर्मचाऱ्यांना निलंबित केलेले आहे.

तसेच लातूर विभागातील, उदगीर आगारात झालेल्या गैरव्यवहाराबाबत श्री.रावीकर व श्री.बिरादार या कर्मचाऱ्यांना निलंबित केले असून त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन उदगीर (शहर) येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस स्टेशन, उदगीर यांचेमार्फत करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे बुलढाणा विभागातील मेहकर आगारातील गैरव्यवहाराबाबत रोखपाल श्री.शिंदे या कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दाखल्यावर रिंग रोड बाधित क्षेत्र अशी नोंद करण्याबाबत

**(६०) * २६९३२ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराची वाहतूक समस्या सोडविण्यासाठी शासनाने टाऊन प्लानिंग (पीएमआरडीए) ने सन १९९७ मध्ये व बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) सन २००२ मध्ये दोन रिंगरोड आखण्यासाठी व भूसंपादन करण्यासाठी जनतेचा पैसा खर्च केला होता व आता नव्याने एम.एस.आर.डी.सी. चा तिसरा रिंग रोड आखण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव शासनाने रद्द करून हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या क्षेत्राचे झोन दाखल्यावर असलेला रिंग रोड बाधित क्षेत्र म्हणून नोंद करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

टाऊन प्लॅनिंग विभागामार्फत दिनांक २५/११/१९९७ च्या अधिसूचनेव्दारे पुणे शहराभोवती रिंग रोडची आखणी मंजूर केली आहे. आखणीसाठी कोणताही खर्च निरंक आहे, असे पीएमआरडीए ने कळविले आहे.

हवेली, जि.पुणे तालुक्यातील थेऊरफाटा ते वडकी या प्रस्तावित रिंगरोडवरील सुमारे १० कि.मी. रस्त्यासाठी सन २००७ व २००८ मध्ये भुसंपादन करून शेतकऱ्यांना ४८.४८ हेक्टर जमिनीचा रू.५.०० लाख इतका मोबदला देण्यात आलेला आहे.

तसेच, एम.एस.आर.डी.सी. या विशेष प्राधिकरणाकडे रिंगरोड मंजूर असून, त्याबाबतची अधिसूचना दि. ३०/११/२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

पीएमआरडीए च्या आखणीमध्ये हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या क्षेत्राचे झोन दाखल्यावर रिंगरोड बाधित क्षेत्र म्हणून नोंद करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केलेली आहे.

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आखणीमध्ये अशा प्रकारची मागणी नाही. तसेच, एम.एस.आर.डी.सी. च्या आखणीमध्ये अशा प्रकारची मागणी नाही, असे उपलब्ध अभिलेखावरून आढळते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणाबाबत

**(६१) * २९३६० श्री.परिणय फुके, श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नारायण राणे : तारांकित प्रश्न क्रमांक २३७२६ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम संथगतिने सुरू असून या राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या चौपदरीकरणासाठी केंद्र शासनाकडून मंजूरी मिळाल्यानंतर आता केंद्र शासनाकडून रुपये ३८०० कोटींच्या खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गाच्या पळस्पे ते इंदापूर या पहिल्या टप्प्यातील कामाला सन २०११ मध्ये मंजूरी देण्यात आली असून सदरहू ८४ कि.मी. लांबीच्या कामासाठी रूपये ९५० कोटी अपेक्षित असून माहे एप्रिल, २०१४ अखेर हे काम पूर्ण होणे अपेक्षित असताना सन २०१६ अखेरही या महामार्गाचे ५० टक्केही काम पूर्ण होऊ शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या भूसंपादनासाठी रत्नागिरी, संगमेश्वर तालुक्यातील पहिल्या टप्यात केंद्र शासनाकडून रूपये ३८१ कोटी प्राप्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर इंदापूर ते माणगाव तालुक्यातील वडपाले आणि महाड तालुक्यातील वीर ते पोलादपूर तालुक्यातील भोगाव खुर्द असे रायगड जिल्ह्यातील दोन टप्पे गृहित धरलेले असून ते कामही आजतागायत हाती घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत तसेच, या महामार्गाकरीता संपादित झालेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

मुंबई-गोवा ह्या ४७५.२१ कि.मी. राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ पैकी पनवेल ते इंदापूर ह्या ८४ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून खाजगीकरणामधून प्रगतीत आहे.

सन २०१६-१७ मध्ये त्यापुढील इंदापूर ते झाराप ह्या ३६६.१७ कि.मी. च्या महामार्गापैकी ३१८.०७ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्र शासनाकडून रुपये ९५०१.१८ कोटीच्या कामांना मंजूरी प्राप्त झालेली आहे. उर्वरित ४८.१ कि.मी. लांबीच्या कामाचा मंजूरी प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे. सदरची कामे हायब्रीड ॲन्युइटी पध्दतीने करण्यात येणार असून केंद्र शासनाने मंजूर रकमेच्या ४०% (रु.३ हजार ८०० कोटी) तरतूद केली आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई गोवा महामार्ग क्र. ६६ पनवेल ते इंदापूर ८४.०० कि.मी. या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेमार्फत दिनांक १९/१२/२०११ पासून प्रगतीत आहे. या प्रकल्पाची किंमत रुपये ९४२.६७ कोटी इतकी आहे. सदरहू काम एप्रिल, २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि कर्नाळा पक्षी अभयारण्य व संवेदनशील क्षेत्र (२० कि.मी.लांबी) तसेच काराव येथील भूसंपादन व वडखळ बाह्य वळण मार्गाकरिता मिठागाराची जागा केंद्र शासनाकडून हस्तांतरीत होणे, मौजे नागोठणे व कोलेटी येथील शासकीय जागेवरील अतिक्रमणे काढणे ह्या बाबींमुळे तसेच सवलतदाराच्या आर्थिक समस्यामुळे चौपदरीकरणाचे कामास विलंब झालेला आहे. सद्यस्थितीत सदरहू काम वेगाने पूर्ण करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त संसाधणे लावण्यात आली आहेत. ४६% काम पूर्ण झालेले असून मार्च, २०१८ पर्यंत संपूर्ण काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

मुंबई गोवा भूसंपादनाकरिता संगमेश्वर व रत्नागिरी तालुक्यासाठी रु.३९१.८६ कोटी इतकी निवाडा रक्कम निधी माहे जानेवारी, २०१७ मध्ये राज्य शासनास प्राप्त झालेली आहे.

(४) हे खरे नाही.

प्रश्नाधीन ६४ कि.मी. महामार्गाला दोन बांधकामासाठी रु.१३९५.८७ च्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी प्राप्त झाली असून निविदा तसेच भूसंपादनाची प्रक्रीया प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

इंदापूर ते झाराप ह्या ३६६.१७ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी १८९ गावांमधील ८६१.९५ हे. भूसंपादनाबाबतची कार्यवाही प्रगतीत असून त्यापैकी १४० गावांमधील भूसंपादनासाठी रु.२६४४.३१ कोटी रकमेचे निवाडे पूर्ण झाले असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून रु.१३८५.८७ कोटी निधी प्राप्त झाला असून मावेजा वाटपाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पंढरपूर ते देहू आणि पंढरपूर ते आळंदी या मार्गाच्याकडेला जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(६२) * २६८७८ श्री.शरद रणपिसे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर ते देहू आणि पंढरपूर ते आळंदी या वारी मार्गाच्या सुमारे ५०० किलोमीटरर्सच्या ४ लेन रस्त्यासाठी सुमारे सहा हजार कोटींची केंद्रीय परिवहन मंत्रालयाची योजना असून यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला आणखी जागा शासनाने उपलब्ध करुन दिल्यास योजना कार्यान्वित करुन या मार्गावर अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देहू-आळंदी-पंढरपूर पालखी मार्गाच्या तांत्रिक बाबींना केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व जहाज बांधणी मंत्रालयाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त योजनेसाठी जमीन संपादित करण्यात येणाऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत आळंदी-पंढरपूर (२७० कि.मी.) व देहू-पंढरपूर (१३५.०० कि.मी.) या दोन्ही रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. ते पूर्ण झाल्यानंतर सोयी व सुविधेबाबत व्यवहार्यता तपासण्यात येईल.

तसेच सद्य:स्थितीत दुपदरी रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचे प्रस्तावित असून ग्रामीण भागात भविष्यात पादचारी मार्गासह सहापदरीकरण शक्य होण्यासाठी तरतूद ठेवण्यात आली आहे. सद्य:स्थितीत भूसंपादनाची कार्यवाही हाती घेण्यात आली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**सुख नदी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) पात्राला संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(६३) * २९४७२ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इमानदारवाडी, एडगाव (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील गावांना सुख नदी पासून धोका असल्यामुळे या ठिकाणच्या धोकादायक नदी पात्राला संरक्षण भिंत बांधून मिळावी यासाठी मा.पालकमंत्री सिंधुदूर्ग यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुख नदीपात्राला संरक्षण भिंत बांधण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून धोका टाळण्यासाठी सूख नदीपात्राला संरक्षण भिंत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) सुखनदी पात्रामध्ये संरक्षक भिंत बांधण्याच्या रु.६७.५३ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी यांचे कार्यालयात तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे व प्रशासकीय मान्यतेसाठी सदरचे अंदाजपत्रक मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना त्यांचे पत्र जा.क्र.७८९, दि. ०२/०३/२०१७ अन्वये सादर करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर संरक्षक भिंतीच्या बांधकामाविषयी पुढील कार्यवाही कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी यांचेमार्फत करण्यात येत आहे..

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## वाडा व विक्रमगड (जि.ठाणे) तालुक्यात पिंजाळ नदी पात्रातील वाळू तस्करी रोखण्याबाबत

**(६४) * २८१७० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा व विक्रमगड (जि.ठाणे) तालुक्याच्या हद्दीतून वाहणाऱ्या पिंजाळ नदी पात्रातून वाळू तस्करी होत असून यासंदर्भात पिक गावातील ग्रामस्थांनी विरोध करून शासनाकडे तक्रारी केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वाळू तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे पिक (ता. वाडा) येथील ग्रामस्थांचे दि. ३/०१/२०१७ रोजीचे वाडा व मलवाडा गावाच्या हद्दीतील पिंजाळ नदीतील अनधिकृत रेती उपसा रोखण्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, पालघर यांना प्राप्त झाले होते. तसेच याच विषयाबाबत दि. ०३/०१/२०१७ रोजी एका वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर निवेदनाच्या / बातमीच्या अनुषंगाने वाडा व विक्रमगड तहसिल कार्यालयाच्या संयुक्त पथकाकडून पिक व मलवाडा हद्दीतील पिंजाळ नदीपात्रात दि. १७/०२/२०१७ रोजी तपासणी करून रेती उपसा करणाऱ्या आठ पत्राहोडी पकडण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वाकाव (ता.माढा, जि.सोलापूर) येथील सीना नदीवर पुल बांधण्याबाबत

**(६५) * २९८५८ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाकाव (ता.माढा, जि.सोलापूर) परिसरातील सुमारे ५००० वस्तीच्या व सीना नदीच्या पलीकडील मानेगाव परिसरातील ग्रामिण भागातील नागरिकांना दैनंदिन कामकाजाकरीता सीना नदीवर पुल नसल्यामुळे प्रवास करणे धोक्याचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सीना नदीवर पुल बांधण्याबाबत नागरिकांनी शासनाकडे निवेदने मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सीना नदीवर पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) माढा तालुक्यातील मौजे वाकाव या गावा जवळून सीना नदी वाहते. सीना नदीवर वाकाव गावाचे वरील बाजूस ३.०० कि.मी. अंतरावर उंदरगाव को.प.बंधारा बांधलेला आहे व वाकाव गावाचे खालील बाजूस ३ कि.मी. अंतरावर खैराव को.प. बंधारा बांधलेला आहे.

मौजे वाकाव येथे ४.५० उंचीचा को.प. बंधारा बांधल्यास वरील बाजूचा उंदरगाव को.प. बंधारा ३.०० मी. पाण्यात बुडतो. को.प. बंधाऱ्यांचे ठिकाण निश्चित करताना शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जास्तीत जास्त १.२५ मी. ओव्हरलॅप मान्य करणे शक्य आहे. १.२५ मी. पेक्षा जास्त ओव्हरलॅप असेल तर तेथे को.प. बंधारा प्रस्तावित करता येत नाही. यास्तव मागणी केलेल्या ठिकाणी-वाकाव येथे को.प. बंधारा बांधणे तांत्रिक दृष्ट्या योग्य राहणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण-देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील सागरी महामार्गावरील कोळंब पुलाची झालेली दुरवस्था

**(६६) * २९१५७ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.नारायण राणे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण-देवगड सागरी महामार्गावरील कोळंब पुलाच्या खांबांना तडे गेल्याने सदर पुलावरून वाहतुक करण्यास धोकादायक झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

पूलाच्या स्तंभांना तडे गेलेले नाहीत. परंतु पूलाच्या तळईला तडे गेले आहेत.
(२) पूलाची तांत्रिक सल्लागारांकडून पहाणी केल्यानंतर पूल क्षतिग्रस्त झाल्याचे निष्पन्न झाले. पूलावरुन अवजड वाहनांची वाहतूक दिनांक १३/१/२०१७ पासून बंद करण्यात आली आहे. या पूलाच्या दुरुस्तीच्या कामास रुपये ३५० लक्ष इतक्या रकमेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या दुरुस्तीच्या कामास तांत्रिक मान्यता प्रदान करुन कामासाठी कंत्राट निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) येथील दांडीपाडा, लोखंडीपाडा, रावतेपाडा, सुतारपाडा या परिसरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(६७) * २८९१० श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (जि.पालघर) येथील दांडीपाडा, लोखंडीपाडा, रावतेपाडा, सुतारपाडा या परिसरातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोईसर पंचायत समितीच्या शाखा अभियंत्यांनी विकासकाच्या फायद्यासाठी बनावट अंदाजपत्रक बनवुन शासनाच्या लाखो रुपयाचा निधी विकासकाच्या सदनिकांमधील अंतर्गत रस्त्यात वापरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हा परिषद, पालघर तसेच शासनाकडे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत तसेच गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.